**विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे**

**१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.**

**दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७** **फॅक्सनं.- ०२०- २६१२२२१७**

**ई मेल आय डीक्र.dydpune @ gmail.com** **वेब साईट- www.dydepune .com**

जाक्र./शिउसं/पुवि/उमाशि-२/**निवेश्रे**/२०१६/ ६२६८/६४

दिनांक- 2 APR 2016

**प्रति,**

प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
अहमदनगर/पुणे/सोलापूर

**विषयः <u>नियमित वेतनश्रेणीतील प्रस्तावाबाबत</u>**

**संदर्भः १. शासन निर्णय दिनांक १४.१०.२०१० मधील तरतुद**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, पुणे विभागातील अहमदनगर/पुणे/सोलापूर जिल्हयातील काही कनिष्ठ महाविद्यालयातील पुर्णवेळ शिक्षण सेवक यांचा ०३ वर्षाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर सुध्दा काही कनिष्ठ महाविद्यालयातील संबधित शिक्षकांचे पुर्णवेळ शिक्षक वेतनश्रेणीत मान्यतेबाबतचे प्रस्ताव सादर करीत नाहीत, सदरचे प्रस्ताव सादर झालेले नसल्यामुळे संबधित पुर्णवेळ शिक्षकांना नियमित वेतनश्रेणीत मान्यता न मिळाल्यामुळे त्यांचे वेतन देता येत नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे.

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील पुर्णवेळ शिक्षण सेवक कालावधी पुर्ण झालेल्या शिक्षण सेवकांचे नियमित वेतनश्रेणीतील प्रस्ताव तात्काळ या कार्यालयाकडे सादर करावेत. तसेच शिक्षक सेवक कालावधी ०३ वर्षे पुर्ण झालेल्या संबधित शिक्षकांना त्यांनी दाखल केलेल्या विनंती अर्जानुसार नियमित वेतनश्रेणीतील मान्यतेबाबत शासन निर्णय दि. १४.१०.२०१० मधील तरतुदीनुसार निर्णय घेण्यात येईल.

ज्या पुर्णवेळ शिक्षण सेवक यांचा कालावधी पुर्ण झालेला आहे, तथापि, संबधित प्राचार्य यांनी त्यांचा नियमित वेतनश्रेणीतील प्रस्ताव या कार्यालयास सादर केला नसल्यास त्या शिक्षण सेवक यांनी या कार्यालयाकडे तात्काळ संपर्क साधावा.

**(रामचंद्र जाधव)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे-१.**

**प्रत माहितीसाठी-**

१ ) अध्यक्ष, पुणे जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय, शिक्षक संघटना